वैध मापन शास्त्र यंत्रणेअंतर्गत निरीक्षक गट-ब (राजपत्रित) यांचे सर्वसाधारण बदली २०१९ अंशत: बदल करणेबाबत.

<u>महाराष्ट्र शासन</u>

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन आदेश क्रमांक - बदली-२०१९ /प्र.क्र.२३/ग्रासं-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३ जुन, २०१९

<u>वाचा</u> :- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक- बदली-२०१९/प्र.क्र.२३/ग्रासं-३, दि.२९ मे, २०१९

<u>शासन आदेश :-</u>

उपरोक्त संदर्भाधीन आदेशान्वये, सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१), ४ (२) व ४ (३) मधील तरतुदीनुसार व समुपदेशनाच्या दिनांक ९ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयानुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकारांच्या मान्यतेने वैधमापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांच्या नियतकालीक बदल्या करण्यात आल्या आहेत. सदर बदली आदेशामध्ये खालीलप्रमाणे अंशत: बदल करण्यात येत आहे. : -

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्याच्या पदावर कार्यरत असल्याचे ठिकाण	संदर्भीय आदेशामध्ये दर्शविलेली पदस्थापना	सुधारीत पदस्थापना
१	२	३	४	५
१	श्री.अ.श्री.येवलेकर	निरीक्षक वैधमापन शास्त्र मनमाड, जि. नाशिक	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, जळगांव-१, जि. जळगांव	मनमाड, जि.नाशिक या पदावर एक वर्ष मुदतवाढ
२	श्री. अ.वि.पाटील	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, जळगांव-२ विभाग, जि. जळगांव	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, जळगांव-१ विभाग, जि. जळगांव	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, जळगांव-१ विभाग, जि. जळगांव
३	श्री.अ.सु.कुलकर्णी	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, औरंगाबाद -२ विभाग	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, मनमाड, जि. नाशिक	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, शेवगाव विभाग, जि.अहमदनगर
४	श्री.अ.ज.मेश्राम	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, नागपूर-७ विभाग	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, नागपूर विभागीय कार्यालय	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, नागपूर-६ विभाग येथे रिक्त होणाऱ्या पदी
५	श्री.एस. एस. गायकवाड	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, औरंगाबाद विभागीय कार्यालय	निरीक्षक, वैधमापन शास्त्र, अमरावती विभागीय कार्यालय	औरंगाबाद विभागीय कार्यालय येथे एक वर्ष मुदतवाढ

२. संबंधीत निरीक्षक यांनी बदलीचे ठिकाणी इतर कोणत्याही आदेशाची प्रतिक्षा न करता हेच कार्यमुक्तीचे आदेश समजुन तात्काळ रुजु व्हावे व आपला रुजु अहवाल नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना तसेच शासनास त्वरीत सादर करावा.

३. उपरोक्त निरीक्षक यांनी नवीन पदाचा कार्यभार त्वरीत स्वीकारावा, त्यांनी अनधिकृतरित्या गैरहजर राहू नये अन्यथा त्यांची अनुपस्थिती अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल व विनावेतन करण्यात येईल. तसेच त्यांच्या सेवेचा खंड पडण्याची शक्यता देखिल नाकारता येत नाही. याची जाणीव संबंधीतांना करुन देण्यात येत आहे.

४. संबंधित अधिका-यांना नवीन पदस्थापनेच्या पदावर रुजु होणेसाठी पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता तसेच इतर अनुषंगिक भत्ते अनुज्ञेय असतील.

५. नियंत्रक, वैधमापन शास्त्र यांना कळविण्यात येते की, संबंधीत निरीक्षकाने पदभार सोडल्याचा व स्वीकारल्याचा दिनांक त्वरीत शासनास कळवावा. विहित कालावधीत संबंधीत अधिकारी बदलीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास, त्याबाबत शासनास त्वरीत अवगत करावे. जेणेकरुन संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई त्वरीत करणे शक्य होईल. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार बदली झालेल्या अधिका-यांचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत / मंजूर करु नयेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०६०४१२१८४२४८०६ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suresh Dnyandeo Redekar

Digitally signed by Suresh Dnyandeo Redekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=00b6deeb0e386eb5698cc129016108429cd770a158e87c3a2a9613 4dccfff610, serialNumber=b0c49d4a2d63d7827dd22b5ccbfc134f691b42353bcee5445 5b220aff75b429c, cn=Suresh Dnyandeo Redekar
Date: 2019.06.04 12:23:29 +05'30'

(सु. ज्ञा. रेडेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व संबंधित निरीक्षक, वैधमापन शास्त्र,

प्रत :-

१) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई (यांना आवश्यक त्याकार्यवाही करीता)
२) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,
३) मा. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक,
४) उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, नाशिक/नागपूर/ औरंगाबाद
५) महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) महालेखापाल -१ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक/नागपूर/औरंगाबाद/जळगाव/ अहमदनगर
९) निवड नस्ती, कार्यासन ग्रासं-३